www.yuvakadhar.in

E mail - dainikyuvakaadhar@gmail.com

facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : १३५ वार बुधवार दि. 29 जानेवारी २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

दै.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

## बीके डॉ शुभदा नील यांच्या हस्ते मान्यवरांचा नील हॉस्पिटल येथे सन्मान



**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

दैनिक युवक आधार नववर्ष दिनदर्शिकेचा प्रकाशन सोहळा शनिवार दि. 25 जानेवारी. २०२५ रोजी नील हॉस्पिटल सेक्टर एक पनवेल येथे जल्लोषात संपन्न झाला. दैनिक युवक आधारचे संपादक संतोष आमले यांचे उत्तम नियोजन, प्रचंड मेहनत आणि आई ग्रुपच्या ऐक्याचा सामाजिकतेचा प्रचंड असा महामेरू यामुळे दैनिक युवक आधार वृत्तपत्राचा दिनदर्शिका सोहळा जल्लोषात संपन्न झाला. यावेळी प्रसिद्ध स्त्रीरोग, कॅन्सर आणि गर्भ संस्कार तज्ज्ञ बीके डॉ शुभदा नील यांच्या हस्ते खान्देश्वर पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरिक्षक स्मिता ढाकणे, पनवेल वाहतुक विभाग वरिष्ठ पोलिस निरिक्षक संजय पाटील, डॉ शितल गोसावी, निलम दाते दिशा महिला मंच, साक्षी सागवेकर अध्यक्ष परिणीता फाउंडेशन, दैनिक युवक आधारचे संपादक श्री व सौ भारती संतोष आमले आणी अनेक मान्यवरांचा नील हॉस्पिटल येथे सन्मान करण्यात आला. बीके डॉ शुभदा नील यांनी अध्यातम्यातून आरोग्य ह्या विषयावर सर्वांना मोलाचे मार्गदर्शन केले.

# सिद्धिविनायक मंदिरात दर्शनासाठी आता 'ड्रेस कोड'

## ठाकरे गटाची महायुतीवर टीका; नेते म्हणाले...

आताच्या घडीला मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी काही नियम असावेत, ही बाब विशेष लक्षात घेतली जात आहे. दक्षिण भारतातील अनेक मंदिरांमध्ये अशी नियमावली फार पूर्वीपासून लागू आहे आणि ती कठोरपणे अमलात आणली जाते. उत्तर भारतातीलही अनेक मंदिरांमध्ये भाविकांनी दर्शनासाठी येताना किंवा दर्शन घेताना काय परिधान करावे, याबाबत नियम करण्यात आले आहेत. महाराष्ट्रात काही मंदिरांमध्ये या बाबत निर्णय होताना दिसत आहेत. या यादीत आता मुंबईच्या सिद्धिविनायक मंदिराची भर पडली आहे.

मुंबईतील सिद्धिविनायक मंदिर हे कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान आहे. तसेच श्रीमंत मंदिरात सिद्धिविनायक मंदिराची गणना केली जाते. मुंबईत पर्यटनासाठी आलेले पर्यटक किंवा भाविक भक्तजन सिद्धिविनायक मंदिरात आवर्जून दर्शनाला जातात. केवळ पर्यटक किंवा भाविक नाहीत, तर राजकारणी, सेलिब्रिटी, दिग्गज मंडळी वेळात वेळ काढून सिद्धिविनायकाचरणी नतमस्तक होतात. याच सिद्धिविनायक मंदिरात दर्शन घेण्यासाठी आता ड्रेस कोड पाळावा लागणार आहे. काही भाविकांच्या



तक्रारींनंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे न्यासच्या वतीने सांगण्यात आले आहे. त्याचबरोबर प्लास्टिक बंदीचाही निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत ठाकरे गटाचे नेते आणि विधान परिषदेतील आमदार सचिन अहिर यांनी पत्रकारांशी बोलताना या निर्णयावरून टीका केली आहे.

तसे परिपत्रक काढण्याचा त्यांना अधिकार आहे का?

ज्यावेळेस विधान परिषदेत यासंदर्भात विधेयक आणले गेले होते. पद्धतशीरपणे तीन पक्षांच्या सदस्यांचा समावेश करण्यासाठी ही आकडेवारी वाढवण्यात आली होती, असा थेट आरोप मी केला होता. आता ज्यांनी परिपत्रक काढले आहे, तसे परिपत्रक काढण्याचा त्यांना अधिकार आहे का, कायदा आणि सुव्यवस्थेतेकडे त्यांनी ते दिले आहे का, असा सवाल सचिन अहिर यांनी केला. तसेच आताच असे परिपत्रक काढायची गरज का पडली. इतक्या वर्षानुवर्षे सिद्धिविनायक मंदिरातील दर्शन भावनात्मक पद्धतीने लोक घेतात. लोक सकाळी चालत येतात. मग कोणी ट्रॅक पँट घालून येतात किंवा अन्य काही कपडे घालून येत असतील, मग हे नवीन संशोधन करणारे कोण आहेत. भाविकांना जे नियम लागू केले जात आहेत, तसेच ते अध्यक्ष आणि ट्रस्टी यांच्याबाबतीत लागू केले जाणार आहेत का, अशी विचारणा सचिन अहिर यांनी केली.

वर्षानुवर्षाची जी प्रथा आहे, ती तशीच सुरू राहिली पाहिजे काही ना काही मुद्दा काढून लोकांच्या भावना पेटवायच्या आणि पुन्हा एका नवीन वादाला सुरुवात करून द्यायची, असे यानिमित्ताने होताना दिसत आहे. वर्षानुवर्षाची जी प्रथा आहे, ती तशीच सुरू राहिली पाहिजे, अशी मागणी यावेळी सचिन अहिर यांनी केली. स्वाभाविक आहे की, लोक आणि भक्तजन मूर्ख नाहीत. तेही देवासमोर नतमस्तक होताना काय आपण कपडे घातले पाहिजेत, कशा प्रकारे जायला पाहिजे, या भावना त्यांच्या असतात. अशा प्रकारे काही नियम काढून भक्तांच्या भावनांशी खेळण्याचा प्रकार होत आहे का, असा प्रश्न आहे, असे सचिन अहिर म्हणाले.

सिद्धिविनायक मंदिरात दर्शनासाठी नवे नियम कोणते?

श्री सिद्धिविनायक मंदिर न्यासचे सदस्य राहुल लोंढे यांनी न्यासने घेतल्या निर्णयांबद्दल माहिती दिली. राहुल लोंढे म्हणाले की, मंडळाच्या विश्वस्तांची बैठक झाली. मंदिरात ड्रेस कोड लागू करण्याचा निर्णय बैठकीत घेतला आहे. काही भक्तांच्या तक्रारी, तर काहींच्या सूचना न्यासकडे आल्या होत्या. मंदिरात काही भाविक येतात. ते कुठल्या जातीचे, धर्माचे पंथाचे असतील. स्त्री असो वा पुरुष. अनेकांचे पेहराव हे समोरच्या व्यक्तींना संकोच वाटेल असे होते. काही भाविक कसेही पेहराव करून येतात. त्यामुळे आम्ही निर्णय घेतला आहे की, पुढच्या आठवड्यापासून सिद्धिविनायक मंदिरात येणारा जो भक्त असेल, त्याचा पेहराव शालीनता आणि पावित्र्य जपणारा असावा. आपण मंदिरात येऊन श्रीगणेशाचे दर्शन घेतोय. त्याचे पावित्र्य जपले जाईल, अशा प्रकारचा पेहराव भाविकांचा असायला हवा, अशी माहिती लोंढे यांनी दिली. तसेच अमूक एक प्रकारचा पेहराव घालावा किंवा अमूक एका पद्धतीचे कपडे घालावेत असे निर्बंध नाहीत. परंतू जो पेहराव असेल, तो इतर भक्तांना संकोच वाटणारा नसावा. त्यामुळेच आम्ही हा निर्णय घेतला आहे. भाविकांनी वेडावाकडा पेहराव न करता यावे. पण, यापुढे तोकडे कपडे किंवा इतर भक्तांना संकोच वाटेल अशा प्रकारचे कपडे घालून येणाऱ्या व्यक्तींना मंदिरात प्रवेश दिला जाणार नाही, असा निर्णय घेण्यात आला असल्याचे लोंढे यांनी सांगितले.

# काळसुरी गावात 5 वा कबड्डी क्रीडा महोत्सव



**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

दिनांक 25 जानेवारी 2025 रोजी अखिल काळसुरी ग्रामस्थ मंडळ काळसुरी, मुंबई आणि काळभैरव क्रीडा संघ काळसुरी* यांच्या सौजन्याने काळसुरी गावात पाचवा क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. या महोत्सवाच्या निमित्ताने गावात कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले होते. या कबड्डी स्पर्धेत म्हसळा तालुक्यातील 24 पुरुष संघांनी भाग घेतला तर 8 महिला कबड्डी संघांनी भाग घेतला होता. कबड्डी सामना पाहण्यासाठी हजारो कबड्डी प्रेमी आजूबाजूच्या गावातून आणि तालुक्यातून काळसुरी गावात आले होते. या कबड्डी सामन्यात पुरुष गटातून श्री काळभैरव क्रीडा संघ- काळसुरी अ या संघाने प्रथम क्रमांक, तर गावदेवी क्रीडा मंडळ- मेंदडी यांनी द्वितीय क्रमांक, तर शिवगर्जना- खरसई ब यांनी तृतीय क्रमांक , तर काळभैरव क्रीडा संघ- काळसुरी - ब यांनी चतुर्थ क्रमांक पटकावला.. त्याचबरोबर महिला संघातून गावदेवी रोहिणी या संघाने प्रथम क्रमांक तर सोमजाई श्रीवर्धन या संघाने द्वितीय क्रमांक , तर जय बजरंग मेंदडी या संघाने तृतीय क्रमांक, तर ओम चिंचबा देवी, बोर्ली या संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला. या महोत्सवात दरम्यान गावातील प्रतिष्ठित सदस्य श्री नामदेव नाकती, गोपाळ बेडेकर, जयराम चाळके, काळसुरी सरपंच राजेंद्रजी घोसाळकर, सह चंद्रकांत बेडेकर, संतोष नकती, राजेंद्र नाकती, म्हसळा कबड्डी असोसिएशनचे उपाध्यक्ष अजय पेरवी, संतोष पेरवी, ग्रामसेवक पूनित जाधव, निर्मला म्हात्रे, वैदही पेरवी, निर्मला चाळके तसेच पंचक्रोशीतून आलेल्या सर्व मान्यवरांचे काळसुरी मंडळाच्या वतीने आणि संघाच्या वतीने सत्कार करण्यात आले..

# आस्था एक आधारस्तंभ"नि:शुल्क समुदेशन केंद्राचा प्रारंभ



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: भारत विकास परिषद या संस्थेच्या वतीने 'समुपदेशन केंद्र' या कायमस्वरूपी प्रकल्पाचा उद्‌घाटन सोहळा संपन्न झाला. आस्था एक आधारस्तंभ' या नावाने नवीन पनवेल सेक्टर १८ येथील डॉ. कीर्ती समुद्र यांच्या क्लिनिकमधे हे केंद्र सुरू करण्यात आले. मानसोपचारतज्ज्ञ डॉ. प्रदीप पाटकर यांच्या हस्ते या केंद्राचे उद्‌घाटन संपन्न झाले. चित्रा पाटकर, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. ओंकार माटे, डॉ. आरोही माटे डॉ. रविंद्र ईनामदार, स्त्रीरोगतज्ज्ञ माधूरी ईनामदार, सुनिल लघाटे, हेमंत चौधरी तसेच के.व्ही.के. बिल्डर्सचे प्रशांत ठाकूर, पनेवलमधील अनुभवी डॉक्टर्स यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर आणि परिषदेचे कार्यकर्ते उपस्थित होते. पनवेल शाखेच्या अध्यक्ष डॉ. कीर्ती समुद्र यांनी आपल्या प्रास्ताविकामधे शाखेच्या विविध उपक्रम व कार्यक्रमांचा आढावा घेतला. सचीव पद्मजा कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. मानसोपचारतज्ज्ञ डॉ. प्रदीप पाटकर आणि डॉ. ओंकार माटे यांनी मार्गदर्शन केले. मानस मित्राची' भुमिका बजावत असताना सदस्याने प्रत्यक्ष संवाद साधत असताना, समोरच्या व्यक्तिचे ऐकून घेतेवेळस आपण स्वतः कसे असावे तसेच व्यक्त होत असताना मुख्यतः आपल्याकडून कोणती खबरदारी घ्यावी तसेच कोणत्या गोष्टी टाळाव्या टाळाव्या यासंदर्भात त्याना मोलाचे मार्गदर्शन केले. हा उपक्रम पूर्णतः निःशुल्क असून गरजूनी याचा लाभ घेण्याचे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

> कुटूंबातील व्यक्तिची पर्यायाने देशाची मानसिक जडणघडण देखील समृद्ध व सदृढ व्हावी या दृष्टीकोनातून आम्ही सखोल अभ्यास केला तेव्हा समाजात 'मानस मित्राची' भुमिका महत्वपूर्ण आहे याची जाणीव झाली. मनावरील ताणतणाव असलेल्या व्यक्तिंची संख्या कमी करण्याकरिता परिषदेच्या वतीने निःशुल्क दरात हा कायमस्वरूपी समुपदेशन केंद्र प्रकल्प उभारण्यात आला आहे. - पद्मजा कुलकर्णी, सचिव, भारत विकास परिषद पनवेल

# १० एक्स्प्रेस आणि सुपरफास्ट गाड्यांना रोहा थांबा देण्यास रेल्वे प्रशासनाची मान्यता .

## रायगडकराना खासदार तटकरेनी दिली प्रजासत्ताक दिनाची भेट .




**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

**मुंबई**–रायगड प्रवास करणाऱ्यांसाठी अत्यंत आनंदाची बातमीआहे .आता रोहा स्थानकात १० ट्रेनला थांबा मिळणार आहे .मुंबईहून रायगड जिल्ह्यातील रोहा स्थानकातून प्रवास करणाऱ्यांसाठी मोठी बातमी आहे. आता मुंबई ते रायगडचा प्रवास सोपा होणार आहे. रेल्वेने रोहा स्थानकात ७६व्या प्रजासत्ताक दिनापूर्वी १० एक्स्प्रेस आणि सुपरफास्ट गाड्यांना थांबा देण्यास सुरवात केली आहे. रेल्वेच्या या निर्णयाने रोहा येथून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.राष्ट्रवादी कॉँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी हा निर्णय घेऊन रोहावासीयांसाठी आणि परिसरांतील श्रीवर्धन, म्हसळा, तळा या तालुक्यांसाठी फायदेशीर ठरणार आहें.आता रोहा रेल्वे स्थानकावर १० एक्स्प्रेस आणि सुपरफास्ट गाड्या थांबतील. रोहा आणि परिसरांमधील नागरिकांची अनेक वर्षांपासून एक्स्प्रेस आणि सुपरफास्ट गाड्यांना रोहा थांबा मिळण्याची मागणी होती. आता कोचुवेली–इंदौर एक्सप्रेस, कोईम्बतूर–हिसार एक्सप्रेस, कोचुवेली–चंदीगड एक्सप्रेस, दादर–तिरुनेलवेली एक्सप्रेस आणि लोकमान्य टिळक टर्मिनस–मडगाव एक्सप्रेस यासह इतर प्रमुख गाड्या रोहा येथे थांबतील.वरील लांबपल्ल्याच्या ट्रेन रोहा स्थानकात थांबल्याने रोहा, माणगाव, कोलाड, श्रीवर्धन, म्हसळा, तळा या या स्थानकांतील प्रवाशांना मोठा फायदा होईल. दक्षिण आणि उत्तर भारताला जोडणाऱ्या या गाड्यांमुळे प्रवास अधिक सोयीचा होणार आहे. यापुढेही रोहा स्थानकावर अधिकाधिक रेल्वे थांब्यासाठी प्रयत्न सुरूच राहतील, असंही यावेळी खासदार तटकरे यांनी सांगितले .रोहा स्टेशनच्या सौंदर्यीकरणा साठी २० कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आल्याची माहिती सुनील तटकरे यांनी दिली. यात स्टेशनच्या आत आणि बाहेर असा दोन्ही भागांचा विकास केला जाईल. या सुधारणांमुळे रोह्यातील रहिवाशांचं भवितव्य सुधारेल, तसेच रोहा आणि परिसराचा प्रचंड विकास होणार असंही तटकरे म्हणाले.

# कर्मवीर विद्याप्रबोधिनी संचलित अनिवासी गुरुकुल प्रकल्पांतर्गत वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून विद्यालयाला मिळणार अत्याधुनिक इंटरॅक्टिव्ह बोर्ड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये संस्थेच्या कर्मवीर विद्याप्रबोधिनी संचलित अनिवासी गुरुकुल प्रकल्पांतर्गत वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली व विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या समारंभात कला, शालेय क्रीडा, वक्तृत्व व नमो चषक क्रीडा व इतर विविध शालेय, विभागीय व राज्यस्तरीय स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र




आणि पुष्पगुच्छ देवून गौरविण्यात आले. यावेळी विद्यालयाचे उपशिक्षक रविंद्र भोईर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच या कार्यक्रमावेळी आय.डी. बी. आय. बँकेकडून विद्यार्थ्यांच्या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शिक्षणासाठी बेनक्यू या कंपनीचा अत्याधुनिक इंटरॅक्टिव्ह बोर्ड विद्यालयास भेट देण्यात आला. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणात शालेय जीवनातल्या आठवणी आणि काही प्रसंग तसेच विद्यालयाच्या जडणघडणीचा आढावा घेतला. तसेच विविध क्षेत्रात नैपुण्य प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख व स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरुणशेठ भगत यांचेही भाषण झाले. दरम्यान सर्व विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण घेण्यास सुलभ होण्याच्या दृष्टिकोनातून विद्यालय व महाविद्यालयास १८ लाख रुपयांचे २० इंटरॅक्टीव्ह बोर्ड देण्याचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जाहीर केले. यावेळी विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या वतीने प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे व मंत्रमुग्ध करणारे नृत्य, नाट्य, गायन, पथनाट्य अशा विविध रंगी आणि वैविध्यपूर्ण आविष्कारांचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. या सोहळ्यास स्थानिक शाळा समितीचे सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतच्या माजी सरपंच माई भोईर, माजी उपसरपंच विजय घरत, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, प्राचार्या प्रणिता गोळे, ज्येष्ठ नेते जयवंत देशमुख, व्ही. के. ठाकूर, वामनशेठ म्हात्रे, भाऊ भोईर, मदन पाटील, वैभव घरत, पी. के ठाकूर, राम मोकल, राजेंद्र देशमुख, रघुनाथ देशमुख, किशोर पाटील, अंकुश ठाकूर, कुंदन मोकल, नामदेवराव ठाकूर, विधिज्ञ रुपेश म्हात्रे, कमलाकर देशमुख, शालिक भोईर, अनुसया घरत, चिंतामण गोंधळी, किरण म्हात्रे, प्रिया शिंदे, प्राचार्य गोवर्धन गोडगे, रविंद्र भोईर, प्रमोद कोळी, संदिप भोईर, बाबुलाल पाटोळे आदीं-सह पंचक्रोशीतील इतर मान्यवर नागरिक, पालक, विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बस भाडेवाढीच्या विरोधात सिल्लोड येथे चक्काजाम आंदोलन




**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-योगेश पालोदकर**

**सिल्लोड(ता.)** एसटी बसची भाडेवाढ तात्काळ रद्द करण्याच्या मागणीसाठी शिवसेना (ठाकरे गट) च्या वतीने सिल्लोड बस स्थानकात आंदोलन करण्यात आले. एसटी भाडेवाढ तात्काळ रद्द करा अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. सर्वसामान्य प्रवाशांच्या खिशाला न परवडणारी भाडेवाढ करून जनतेचा विश्वासघात केल्याचा आरोप पदाधिकाऱ्यांनी केला. या आंदोलनात तालुका प्रमुख रघुनाथ घरमोडे ,तालुका संघटक भास्कर आहेर, शहर प्रमुख मच्छिंद्र धाडगे, उप तालुकाप्रमुख शिवा गौर, रामेश्वर काळे, महिंद्र बावस्कर, संजय कळात्रे ,दशरथ सुरडकर, प्रकाश वराडे, युवा सेना शहर प्रमुख रामेश्वर एडोले ,उपशहर प्रमुख किशोर लोखंडे, माधव गुंजाळ, सखाराम दुधे, सचिन पाटील, रामदास चाथे, त्र्यंबक चाथे,सागर गौर, हरिभाऊ काळे, राजू वाघ, सागर सोनवणे, सिंघम तायडे, रामधन कायटे , सुनील पंडित,आदी सहभागी झाले यावेळी आगार प्रमुख विजय कळवणे यांना निवेदन देण्यात आले.

## ठाण्यात हायपर सिटी मॉलच्या पहिल्या मजल्यावर भीषण आग.





**दैनिक युवक आधार**
**अमित जाधव - प्रतिनिधी**

**ठाणे ता २८ जाने** : आज सकाळी ८ वाजताच्या सुमारास ठाण्यातील हायपर सिटी मॉल, कासारवडवली, घोडबंदर रोड, या ठिकाणी हायपर सिटी मॉलच्या पहिल्या मजल्यावरील Puma Shop या १५२५ स्क्वेअर फुटचा गाळामध्ये भीषण आग लागली होती. सदर घटनास्थळी ठा.म.पा. उप-आयुक्त श्री. गोदेपुरे. आपत्ती व्यवस्थापन अधिकारी वाय. एम. तडवी व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१-पिकअप वाहनासह, कासारवडवली पोलीस अधिकारी व कर्मचारी, अग्निशमन दलाचे जवान ०१-रेस्क्यू वाहनासह, ०२-फायर वाहनासह, ०२-हायराईस फायर वाहनासह, ठा.म.पा. वैद्यकीय अधिकारी व ०१-कॉर्डियेक रुग्णवाहिकेसह, १०८ ची रुग्णवाहिका व वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. सदर घटनास्थळी कोणालाही दुखापत नाही. सदर घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांच्या मदतीने ०१-तासाच्या प्रयत्नानंतर आग पूर्णपणे विझविण्यात आली आहे.

## शांतीबाई वाडेकर यांचे वयाच्या 82 व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे : महेंद्र माने**



केएमजी विभागातील कुंभारआळी मधील रहिवासी शांतीबाई पांडुरंग वाडेकर यांचे वयाच्या 82 व्या वर्षी मंगळवार 21 जानेवारी रोजी रात्री 11.00 वा. च्या दरम्यान वृद्धापकाळाने निधन झाले.अतिशय शांत व प्रेमळ स्वभावाच्या शांताबाई वाडेकर यांच्या पार्थिवावर येथील कुंभारआळी स्मशानभूमीत बुधवार 22 जानेवारी रोजी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात सुधीर,दीपक व कांचन ही तीन मुले,सूना व नातवडे असा परिवार आहे. यांचे दशक्रिया विधी गुरुवार 30 जानेवारी रोजी तर उत्तरकार्य रविवार 02 फेब्रुवारी रोजी राहत्या घरी होणार असल्याची माहिती वाडेकर कुटुंबियांनी दिली.

## मांदाड चेक पोस्ट ते मांदाड ब्रिज पर्यंत रस्त्यावर खड्डेच खड्डे. शासनाचे दुर्लक्ष.

**दैनिक युवक आधार**
**तळा प्रतिनिधी नितीन लोखंडे.**

**तळा :** तालुक्यातील मांदाड चेक पोस्ट पासून ते मांदाड ब्रिज पर्यंत साधारणतः दोन ते अडीच किलोमीटर अंतर असलेल्या रस्त्यावर खड्डेच खड्डे असल्यामुळे पर्यटकांना नागरिकांना वाहन चालकांना खड्ड्यांचा त्रास सहन करत प्रवास करावा लागत आहे. पावसाळ्यामध्ये या मार्गावरील खड्ड्यांचा अंदाज येत नसल्यामुळे मालवाहतूक ट्रक, ट्रॅव्हल्स या वाहनांच्या गाडीचे पाटे तुटल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे वाहन चालकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. या खड्ड्यांमुळे अनेकदा बाईकस्वार पडून जखमी झालेले आहेत. बाहेरच्या जिल्ह्यांतून आलेल्या शैक्षणिक सहलींच्या विद्यार्थ्यांना खड्ड्यातून प्रवास प्रवास करावा लागत आहे. वळणावर रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या झाडांमुळे वाहनांचा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शासन प्रशासनाने लक्ष देऊन येथील रस्ता दुरुस्त करण्यात यावा अशी नागरिकांची मागणी होत आहे. मांदाड चेक पोस्ट ते खाजणी या मार्गावर असलेल्या खाडी पुलामुळे तीन-चार तालुके, पर्यटन शहरे एकमेकांना जोडली गेली आहेत. नागरिकांना पर्यटकांना अलिबाग मुरुड वरून हरिहरेश्वर श्रीवर्धनकडे जाण्यासाठी तसेच श्रीवर्धन हरिहरेश्वर दिव्याआगर वरून मुरुड अलिबाग रोह्याकडे येण्यासाठी या मार्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असतो. त्यामुळे या मार्गावर रात्रंदिवस वाहनांची रहदारी असते. कोकण हे निसर्ग सौंदर्याने नटलेले आहे. कोकणामध्ये पर्यटकांची संख्या वाढवण्यासाठी रस्त्यांचा विकास होणे गरजेचे आहे. जर पर्यटकांची संख्या वाढली तर छोट्या-छोट्या उद्योगधंद्यांना चालना मिळून स्थानिकांचा रोजगाराचा प्रश्न सुटण्यासाठी मदत होणार आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा

## माजी सरपंच रमेश पाटील यांच्याकडून विद्यालयासाठी स्वच्छतागृह

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

श्री भैरवदेव विद्यालय आणि लोकनेते श्री रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयातील एच एस सी आणि एसएससी विद्यार्थ्यांचा शुभचिंतन समारंभ रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी ह. भ. प. वैकुंठवासी शालुबाई सिताराम पाटील यांच्या स्मृती प्रित्यर्थ माजी सरपंच रमेश पाटील यांनी विद्यालयासाठी ३ लाख २५ हजार रुपये खर्च करून उभारलेल्या स्वच्छतागृहाचेही उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय टी देशमुख, दुंदरे सरपंच सुभाष भोपी,



माजी सरपंच रमेश पाटील, विद्यालयाचे स्थानिक स्कूल कमिटी सदस्य राजेश भोपी, बळीराम भोपी, वंदना भोपी, दीपक पाटील शांताराम चौधरी, विद्यालयाचे मुख्याध्यापक साळुंखे यांच्यासह विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यालयातील विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या तसेच मागील वर्षी इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेत पहिले तीन आलेल्या विद्यार्थ्यांचे तसेच नमो चषक २०२५ स्पर्धेत १७ वर्षाखालील वयोगटातील विद्यालयाला चौथा क्रमांक मिळाल्याबद्दल विद्यार्थ्यांचा आणि क्रीडा शिक्षकांचा यावेळी सत्कार करण्यात



आला. दरम्यान लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी चंद्रपूर येथे होणाऱ्या खुल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या निखिल भोपी याचा संपूर्ण खर्च करण्याचा आश्वासन निखिलला दिले आहे तसेच विद्यालयासाठी १० स्मार्ट ब्लॅक बोर्ड उपलब्ध करून देणार आहेत. या कार्यक्रमा वेळी मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. विद्यालयासाठी स्वच्छतागृह उपलब्ध करून देत सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम दुंदरे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रमेश पाटील यांनी केल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्यांचे कौतुकही केले.

## पॅनेसिया हॉस्पीटल सोनारी यांच्या वतीने रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत वैद्यकिय शिबिराचे आयोजन !!

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी एम. डी. भोईर**
**रणिता ठाकूर**

सुरक्षित वाहन चालवण्याच्या पद्धतींना चालना देण्यासाठी आणि वाहतूक नियमांबद्दल समाजाला प्रेरित करण्यासाठी पॅनेसिया हॉस्पिटल, सोनारी यांनी उरणमध्ये रस्ता सुरक्षा जागरूकता शिबिराचे आयोजन केले होते. चला एकत्र, सुरक्षिततेला प्राधान्य देऊ आणि रस्ते अपघात कमी करूया.याकरिता पॅनासिया हॉस्पिटल, सोनारी तर्फे रस्ता सुरक्षा जनजागृती शिबीर उरण सोनारी येथे नवी मुंबई वाहतूक विभाग, इनर वेल क्लब ऑफ न्यू पनवेल, पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी कॅम्प चे आयोजन 27 जानेवारी 2025 रोजी पॅनासिया हॉस्पिटल येथे सुरक्षा रक्षक पोलिसांकरिता सदर कॅम्पचे आयोजन करण्यात आले.या कॅम्प मध्ये पोलीस अधिकारी, पोलीस कर्मचारी आणि सामान्य नागरिक यांनी आपली शारीरिक तपासणी करून घेतली.सध्या धावपळीच्या काळात आणि या धक्काधक्कीच्या जीवनात स्वतःकडे लक्ष देण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नसल्याने.आणि मग अचानकपणे एखाद्या आजाराचे लक्षणे आपल्यासमोर दिसत आहेत.







याचाच विचार करून.भविष्यात उद्भवणाऱ्या शारीरिक समस्यांबद्दल जागृत राहण्याकरता सदर आरोग्य तपासणी कॅम्प घेण्यात आला. सदर कॅम्प पॅनासिया हॉस्पिटलमध्ये घेतल्यामुळे डॉ सुभाष सिंग यांनी आभार व्यक्त करताना असे म्हटले की आम्हालाही सामाजिक कार्य करण्याची संधी दिलीत त्याबद्दल आभार. त्याचबरोबर जी एम मुजावर पोलीस निरीक्षक आणि अतुल दहिफळे पोलीस निरीक्षक यांनी रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत मार्गदर्शन करताना सांगितले की सदर आरोग्य तपासणीचा आमच्या सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना नक्कीच फायदा झालेला आहे. रस्ता सुरक्षा संदर्भात मार्गदर्शन केले. तसेच सदर आरोग्य तपासणी मधून आरोग्य संदर्भातील तपासणी अंतर्गत काही कर्मचाऱ्यांना पुढील तपासणी करता सहकार्य करण्याची भावना व्यक्त केली. सदर कॅम्प मध्ये ईसिजी, आर बी एस, रक्तदाब, ऑक्सीजन पातळी, ऑर्थोपेडिक कन्सल्टेशन, फिजिशियन कन्सल्टेशन, करण्यात आले. सदर आरोग्य तपासणी कॅम्प यशस्वीपणे पार पाडण्याकरता पॅनासिया हॉस्पिटल ते वरिष्ठ डॉक्टर सुभाष सिंग, डॉ शरद गुप्ता, डॉ शिवराज शेट्टे आणि संपूर्ण स्टाफ त्याचबरोबर महाराष्ट्र उत्कर्ष समिती अध्यक्ष डॉ अशोक म्हात्रे, इनर व्हेल क्लब नवीन पनवेल संपदा बापट अंजली राजपूत, प्रमुख मार्गदर्शक अतुल दहिफळे उरण पोलीस स्टेशन, एमआर बी.टी. न्हावा सेवा पोलीस स्टेशन, जी.एम. मुजावर न्हावासेवा वाहतूक पोलीस, डॉ सुभाष सिंग ऑर्थोपेडिक तज्ञ. यांनी सदर कॅम्प यशस्वी पणे पार पाडण्यास अथक प्रयत्न केले. आणि सदर कॅम्प यशस्वीपणे पार पाडण्यात आला.

## जिल्हा परिषद शाळा गवाळी येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा. विविध कार्यक्रमांचे आयोजन.



**दैनिक युवक आधार**
**गौरव खरे**
**. मुरबाड प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळा गवाळी येथे 26 जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त शैक्षणिक,व सांस्कृतिक कायक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी डान्स व निबंध स्पर्धा भरवण्यात आली होती. शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या सहभागातून विविध कार्यक्रम करण्यात आले या कार्यक्रमासाठी गवाळी गावचे सरपंच, उपसरपंच, माजी सरपंच सदस्य, व गावचे पोलीस पाटील शाळा व्यवस्थापक कमिटीचे अध्यक्ष,उपाध्यक्ष,सदस्य,आणि ग्रामस्थ व शाळेचे शिक्षक,यांच्या सर्वांच्या उपस्थितीमध्ये प्रजासत्ताक दिनाचा कार्यक्रम चांगल्या प्रकारे करण्यात आला.

# लासलगांवचे उपबाजार आवार निफाड येथील विविध विकास कामांचा भुमिपूजन सोहळा संपन्न

**युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

**सोमवार,** दि. २७ रोजी कृषि उत्पन्न बाजार समिती, लासलगांवचे उपबाजार आवार निफाड येथील विविध विकास कामांचा भुमिपूजन सोहळा आमदार दिलीप काका बनकर यांच्या शुभहस्ते व बाजार समितीचे सभापती बाळासाहेब रामनाथ क्षिरसागर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला.सदस्य राजेंद्र डोखळे यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक सादर करून कृषि उत्पन्न बाजार समिती लासलगांव अंतर्गत उपबाजार आवार निफाड येथील विविध विकास कामांची माहिती दिली त्यानुसार जुने व नवीन बाजार आवारातील लिलावाच्या मोकळ्या जागेत डांबरीकरण करणे, गटार बांधणे व भविष्यात लिलाव शेड बांधकाम करण्याचे मानस जाहीर केला. सदस्य भिमराज काळे यांनी उपबाजार आवार निफाड येथील विकास कामांना अडथळा कशाप्रकारे येत होता व जमीन NA करण्यास बराच विलंब लागला ते दूर करून विविध विकास कामांना सुरुवात केले बाबत आपले मनोगत व्यक्त केले. सदस्य पंढरीनाथ थोरे यांनी बाजार समितीच्या कामकाजात लासलगाव, निफाड, विंचुर व खानगांव नजीकची या बाजार आवारातील विविध विकास कामांची माहिती देऊन निफाड येथील जुने व नवीन बाजार आवारातील डांबरीकरण कामाची माहिती दिली. सभापती बाळासाहेब शिरसागर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात उपबाजार निफाड येथील नवीन जागेत विकास कामे करण्याकरीता जागा येणे करून त्यावर डांबरीकरण करणे सांडपाण्याची व्यवस्था करण्याचे काम हाती घेतले असून विंचूर बाजार आवाराकरीता जागा कमी पडत असून तेथेही नवीन



जागा घेणे संदर्भात माहिती दिली. तसेच खानगांव उपबाजार भाजीपाला मार्केट म्हणून उदयास आलेले असून येथील जागेचा प्रश्न सोडवणे बाबत मा. आमदार साहेबांना आग्रह केला आहे. आमचे संचालक मंडळ शेतकऱ्यांसाठी सदैव्य तत्पर राहून विविध विकास कामे करण्यास कधीही मागे पडणार नाही असे आश्वासन दिले. आमदार दिलीप काका बनकर यांनी आपल्या हस्ते झालेल्या डांबरीकरण करणे या कामकाजाचे भूमिपूजन कार्यक्रमात विकास कामे करणेस बाजार समिती संचालक मंडळ मदत करणेस सदैव तत्पर राहील. तसेच खानगांव उपबाजार येथील जागेतील प्रश्नासाठी पणन मंत्री व कृषिमंत्रीना सामोरे जाऊन निफाड कार्यक्षेत्रातील माझ्या शेतकरी बांधवांना येणाऱ्या अडचणी दूर करणे करता मी कधीही मागे पडणार नाही याची ग्वाही दिली. या वेळेप्रसंगी तहसिलदार विशाल नाईकवाडे , बाजार समितीचे उपसभापती गणेश डोमाडे, सदस्य भिमराज काळे, जयदत्त होळकर, संदिप दरेकर, छबुराव जाधव, राजेंद्र डोखळे,सोनिया होळकर,सुवर्णा जगताप,श्रीकांत आवारे, तानाजी आंधळे,पंढरीनाथ थोरे, ज्ञानेश्वर जगताप, महेश पठाडे, राजेंद्र बोरगुडे, प्रविण कदम, बाळासाहेब दराडे,रमेश पालवे, सचिव नरेंद्र वाढवणे, शिवाजी ढेपले, सागर कुंदे, संजय गाजरे, संपत डुंबरे, रमेश जाधव, अजय सोनी,आनंद दायमा, दिलीप कापसे,सचिन जाधव, सुहास सुरळीकर,शाम गोळे, दत्तात्रय डोमाडे,पोपट नवले,विशाल बर्के, संतोष टोपे, शिवाजी धारराव, सुधाकर कापसे, नितीन बोरगुडे, दशरथ घायाळ, सुरेश जाधव, ज्ञानेश्वर नवले, कांदा धान्य व्यापारी, माथाडी कामगार, ग्रामस्थ उपस्थित होते.

# मेडिकवर हॉस्पिटलमध्ये मिट्राक्लिप प्रक्रियेनंतर ७८ वर्षीय रुग्णाच्या हृदयविकारावर यशस्वी उपचार

**दैनिक युवक आधार** - नवी मुंबई: मेडिकवर हॉस्पिटलमधील वरिष्ठ इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट आणि व्हॉल्व्ह तज्ञ डॉ. अनुप महाजनी, या प्रक्रियेचे शोधक डॉ. सायबल कर(इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट व या प्रक्रियेचे शोधक कॅलिफोर्निया, यूएसए), डॉ. मनोज अग्रवाल (सीनियर इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट, हैदराबाद), डॉ. नितीन बुरकुले (सीनियर इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट आणि इकोकार्डियोग्राफी तज्ञ) यांच्या टिमने मायट्रल रेगर्जिटेशन( हा एक विकार आहे ज्यामध्ये हृदयाच्या डाव्या बाजूला असलेला मिट्रल झडप नीट बंद होत नाही) आणि हार्ट फेल्युअरन् ग्रस्त अशा ७८ वर्षीय रुग्णावर दुर्मिळ आणि गुंतागुतीची प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली. ही आधुनिक प्रक्रिया असून ओपन-हार्ट सर्जरीसाठी उच्च-जोखीम असलेल्या रुग्णांकरिता आशेचे किरण ठरत आहे. मिट्राक्लिप ही धातूची छोटी क्लिप असते, त्यासोबत पॉलिएस्टर कापड असते, गळती होत असलेले मिट्रल वाल्व दुरुस्त करण्यासाठी योग्य जागी बसवली जाते आणि त्यामुळे रक्त प्रवाह योग्य दिशेने वाहू लागतो. हृदय निकामी झालेल्या रुग्णांसाठी ही जागतिक पातळीवर स्वीकारण्यात आलेली प्रक्रिया आहे. मुंबईतील श्री. शिवाजी सांगलीकर हे गेल्या ३ वर्षांहून अधिक काळापासून १० टक्के ऱ्हदयाची पंपिंग क्षमता व दीर्घकालीन




हृदयविकाराचा सामना करत होते. सहा महिन्यांपूर्वी मेडिकवर हॉस्पिटलमध्ये डॉ. अनुप महाजनी यांनी त्यांचे सीआरटी-डी इम्प्लांटेशन केले, ज्यामुळे त्यांच्या ऱ्हदयाची पंपिंग क्षमता ३५ टक्क्यांपर्यंत सुधारली, त्यानंतर त्यांच्या आयुष्याची गुणवत्ता सुधारली आणि हृदयविकारासाठी वारंवार रुग्णालयात दाखल होण्याचे प्रमाणही कमी झाले. तरीही गंभीर मायट्रल रिगर्जिटेशनमुळे त्यांना रात्रीच्या वेळी कधीकधी श्वास घेण्यास त्रास होत होता. त्यांचे वाढलेले वय आणि मधुमेह तसेच क्रॉनिक रेनल फेल्युअर सारख्या विकारांमुळे ओपन-हार्ट सर्जरीचा पर्याय गुंतागुंतीचा होता. रुग्ण डॉ. अनुप महाजनी (इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट आणि व्हॉल्व्ह एक्सपर्ट) यांचा सल्ला घेत पुढील उपचार प्रक्रिया निश्चित केली. डॉ. अनुप महाजनी(वरिष्ठ इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट आणि व्हॉल्व्ह एक्सपर्ट) सांगतात की, आपत्कालीन परिस्थितीत रुग्ण दाखल झाला होती. त्याच्या एका आठवड्यापूर्वीच रुग्णाला व्हेंट्रिक्युलर टाकीकार्डियामुळे अनेक झटके आले होते. वाढत्या वयामुळे पारंपारिक शस्त्रक्रिया अत्यंत धोकादायक ठरली असती. मिट्राक्लिप प्रक्रियेसाठी तो योग्य आहे की नाही हे निश्चित करण्यासाठी डॉ. अनुप महाजनी यांनी 3D TEE (ट्रान्स एसोफगीयल इकोकार्डियोग्राफी) केली. ही हृदयाची इमेजिंग करण्याची एक पद्धत आहे. यामध्ये, हृदयाच्या आतून इमेज घेतल्या जातात. यासाठी, एक पातळ आणि लवचिक ट्यूब गळ्यातून खालील भागात घालण्यात येतो. या रुग्णासाठी मिट्राक्लिप प्रक्रिया हा एक उत्तम उपाय होता, जो उत्कृष्ट परिणामांसह कमीत कमी आक्रमक दृष्टिकोन पुरविते. मिट्राक्लिपमुळे व्हॉल्व्ह बंद करण्यास (क्लिपिंग) मदत होते. ही प्रक्रिया सुमारे दीड तास चालली. त्यानंतर रुग्णाला दुसऱ्याच दिवशी घरी सोडण्यात आले. आता हा रुग्ण कोणत्याही अडथळ्यांशिवाय श्वास घेत आहे आणि चांगल्या दर्जाचे जीवन जगत आहे. रुग्णावर योग्य वेळी उपचार न केल्यास त्याचा मृत्यू होऊ शकतो. पारंपरिक ओपन हार्ट शस्त्रक्रिया ज्यांच्यावर केली जाऊ शकत नाही अशा अशक्त प्रकृतीच्या व वयस्क रुग्णांना नवे जीवन देण्यात मिट्राक्लिप रोपण हे एक वरदान ठरले आहे. पारंपरिक शस्त्रक्रियेशी तुलना करता मिट्राक्लिप प्रक्रियेनंतर पुन्हा-पुन्हा रुग्णालयात भरती व्हावे लागत नाही. त्यामुळे दीर्घ कालावधीचा विचार केला तर ही प्रक्रिया कमी खर्चिक ठरते आणि रुग्णांना सर्वसामान्य जीवन पुन्हा जगण्यास सुरुवात करता येते. यामुळे रुग्णाला घ्याव्या लागणाऱ्या औषधांच्या संख्येत लक्षणीय घट होऊ शकते. प्रक्रियेचा परिणाम तात्काळ होतो आणि लाईव्ह इकोकार्डियोग्राफी प्रक्रियेदरम्यान एमटीची तीव्रता कमी झाल्याचे दर्शवते असेही डॉ महाजनी यांनी स्पष्ट केले. मला श्वास घेण्यास त्रास आणि थकवा जाणवत होता, अगदी साध्या सोप्या कामांसाठी देखील संघर्ष करावा लागत होता. मला कधीच वाटले नव्हते की मी सामान्य जीवन जगू शकेन मात्र डॉ. अनुप महाजनी आणि त्यांच्या टीमने मला नवे आयुष्य मिळवून दिले. मी आता फिरायला जाऊ शकतो, माझ्या कुटुंबासोबत वेळ घालवू शकतो आणि कोणत्याही आधाराशिवाय स्वतंत्रपणे जगू शकतो. प्रक्रियेमुळे मला खरोखरच जगण्याची दुसरी संधी मिळाली आहे अशी प्रतिक्रिया रुग्ण श्री. शिवाजी सांगलीकर यांनी व्यक्त केली.

## महिलांच्या हस्ते ध्वजारोहण करून प्रजासत्ताक दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**मोहम्मद पिंजारी**
**लातूर प्रतिनिधी**

मुरुड परिसरात नामांकित असणाऱ्या सीबीएसईचे प्रभावी अध्यापन करून कै. गोरोबा ( काका ) झाडके यांच्या ध्येयर्तीने मार्गक्रमण करणाऱ्या श्री छत्रपती शाहू मॉडर्न इंग्लिश स्कूल मध्ये आज प्रजासत्ताक दिनी प्रज्ञा पाटील , मिनाक्षी सावंत व शाळेच्या सदस्या अश्विनी झाडके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले . कार्यक्रमाला संस्था कोषाध्यक्ष प्रा. शंकर पाटील यांचे मार्गदर्शन लाभले तर प्रत्यक्षदर्शी संस्थेचे अध्यक्ष दिपक झाडके , सचिव प्रा. दत्तात्रय जाधव , ओम झाडके , मुख्याध्यापक बाबू थॉमस , उप मुख्याध्यापक उमेश कुंभार व समन्वयक रामेश्वर शेटे उपस्थित होते . यावेळी क्रिडा शिक्षक राजेश बावळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी परेड सादर केला तर तर बालजी भिसे यांच्या संघाने मानवी मनोरे सादर केले . तसेच रेश्मा कुंभार , कल्यानी राऊत , ज्योती ढेकणे , उषा नाईकनवरे , महादेवी देशमुख , गीता फेरे , ज्योती घोंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रि - प्रायमरीच्या मुलांनी नृत्य सादर केले . ज्योती वांगसकर व दिपाली पवार यांच्या संघाने लेझीम सादर केला . तर नेहा कणसे व संगीता बिटले यांचे संघाने नृत्य सादर केले . संगीत शिक्षक प्रशांत जाधव , अर्जुन नाडे व आदित्य सिंग यांनी देशभक्ती पर गीत सादर केले . तर विद्यार्थी अभिजित नाडे , आयुषी पवार यांनी भाषणे केली . बबीता गिरी व वैशाली देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील ओमश्री मगर, श्रुती सरवदे , अमरजीत समुद्रे , सोहम गणापूरे या विद्यार्थांनी सुत्रसंचलन केले . प्रमुख पाहुण्यांनी शाळेचे कौतुक केले तर मुख्याध्याक



बाबू थॉमस यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्व पटवून दिले . कार्यक्रमाचे आभार प्रजीश पी. यांनी मानले . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशांत कुलकर्णी , अर्चना पाटील , संध्या माळी , आकांक्षा लोमटे , अश्विनी नाडे , शांती मार्डी , रोहिणी कासार , श्रीदेवी माशाळकर , प्रगती कुंभार , क्लेरम्मा जेकप यांचे सहकार्य लाभले . कार्यक्रमासाठी पालकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद होता . सर्वांनी अल्पोपहाराचा आनंद घेतला . शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान लाभले .


**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## शोकाकुल वातावरणात संतोष आखाडे यांना दिला अखेरचा निरोप...

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना(अशोक ठोके)**



दि.28 रोजी आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते,सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार संतोष आखाडे यांचे दि.28 जानेवारी रोजी सकाळी निधन झाले, मृत्यू समयी ते 55 वर्षांचे होते. मागील काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यांच्यावर प्रारंभी जालना व त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचार करण्यात येत होते. मात्र मंगळवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्या पार्थिवावर वैकुंठधाम स्मशाभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी समाजातील सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यांच्या पश्चात आई,पत्नी, दोन मुले,तीन मुली,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार अर्जुन पाडेवार यांचे ते मामा होते.

## उगाव हायस्कूल मध्ये प्रजासत्ताक दिन देशभक्तीपर वातावरणात साजरा

**युवक आधार**
**निफाड /प्रतिनिधी**
**राहूल कुलकर्णी**

महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे,छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय उगाव, ता. निफाड येथे भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन देशभक्तीपर वातावरणात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाचे ध्वजारोहण विनता शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष साहेबराव पानगव्हाणे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी उगाव हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध सामूहिक सांस्कृतिक कार्यक्रम साजरे केले. सदर कार्यक्रमाला गावातील पदाधिकारी,प्रतिष्ठित नागरिक यांसह प्रेक्षकांनी मोठी दाद देऊन प्रतिसाद दिला. यावेळी विद्यालयात विनता शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक विष्णू पानगव्हाणे, शंकर पानगव्हाणे यांसह प्रतिष्ठित नागरिक सदाशिव आहेर, केदुआप्पा पानगव्हाणे, दिलीप रणभोर, कदीर सैय्यद, प्राचार्य कैलास गवळी यांसह उगाव पंचक्रोशीतील पालक,विद्यार्थी, शिक्षक,शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापू आव्हाड यांनी तर संचलन आज्ञा भालचंद्र सूर्यवंशी यांनी दिली.



छायाचित्र - उगाव हायस्कूलमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करताना मान्यवर.

## परिवर्तन वेलफेअर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजू वाघमारे यांचा वाढदिवस उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मुंबई(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)**

परिवर्तन वेलफेअर फाऊंडेशन अंतर्गत फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.राजू वाघमारे(शिवसेना शिंदे गटाचे सहप्रवक्ते/उपनेते) यांचा वाढदिवस नुकताच सदाकांत ढवण उद्यान,नायगाव,दादर पुर्व येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.याप्रसंगी मोनार्च डायमंडचे संस्थापक महेश उकार्डे,भाजपा म्हाडा सेल शिवडी विधानसभा क्षेत्राचे महामंत्री मंगेश कडुलकर तसेच जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन अभिष्टचिंतन केले व वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.सहप्रवक्ते-उपनेते डॉ. राजू वाघमारे यांच्या वाढदिवसाप्रित्यर्थ विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले होते.उपस्थितांनी कार्यक्रमाचा मनमुराद आनंद घेतला.तसेच लकी ड्रॉच्या माध्यमातून लाडक्या बहिणींना पैठणी भेट देण्यात आली.याप्रसंगी डॉ.राजू वाघमारे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी विविध राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी तसेच सामाजिक,सांस्कृतिक,शैक्षणिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थितीती दर्शविली होती.







**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संदेश बांदल माणगाव**
सालाबाद प्रमाणे याही वर्षी क्रिकेट चे सामने खेळवण्यात आले फायनल राऊंड रोहित इलेव्हन या संघाने फर्स्ट प्राइस फटकावला त्यावेळी त्यांचे सन्मान व त्यांचे टीम यांना ट्रॉफी सन्मानचिन्ह देऊन त्यांच्या अभिनंदन केले







## परप्रांतीय नागरिकांची रहिवासी चौकशी करतांना पोलीस निरीक्षक गणेश गुरव

**युवक आधार**
**निफाड/प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

**निफाड -** निफाड पोलीस स्टेशनच्या हद्दी मध्ये कामानिमित्त किंवा व्यापार करण्यासाठी आलेले परप्रांतीयांची संख्या 1 ते दीड हजारांवर असेल तसेच सध्या द्राक्ष काढणी हंगाम हि जोरात सुरू आहे. परप्रांतीय मजूर व व्यापारी संख्या अजून वाढत असते म्हणून निफाड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नागरिक व शेतकरी यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने निफाड पोलिस निरीक्षक गणेश गुरव यांनी चौकशी मोहीम राबविली.



निफाड शहरातील काही लोकांनी परप्रातीय नागरिकांना आपल्या खोल्या भाडे तत्वावर दिल्या आहेत व प्रत्येक एक एका खोली मध्ये 4 ते 5 लोक राहतात परंतु त्यांचे नाव पत्ते किंवा कोणताही रेकॉर्ड खोल्या मालकांकडे आढळून आलेला नाही,त्यामध्ये कोणी काही गुन्हा केला तर त्याचा शोध घेणे खूप अवघड असते.म्हणून घरमालक यांनी घर किंवा खोली भाडे तत्वावर देतांना भाडेकरू इसमाचे 11 महिण्याचा बॉण्ड करून घेतला पाहिजे तसेच त्याची माहिती पोलीस स्टेशनला दिली पाहिजे. निफाड हद्दीतील विशेष करून परप्रांतीय ज्या ठिकाणी राहत आहे त्या घरमालकांना पोलिस ठाण्यात बोलावून निफाड पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांनी मिटिंग घेऊन घरामालकांना योग्य सूचना दिल्या आहेत,घरामालकांनी परप्रांतीय नागरिक मुसाफिर मजूर यांचे रजिस्टर तयार करून त्यांचे आधार कार्ड नाव पत्ते व फोटो त्यामध्ये नमूद करून रहिवास बद्दल संपूर्ण माहितीची एक प्रत पोलीस स्टेशनला देण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.निफाड पोलिस ठाण्याच्या हाद्दीमध्ये यापुढे घरभाडेकरू ने काही अपराध केल्यास त्याच्या बाबतीत शासनाने ठरवलेले नियमांचे पालन केले नाही तर संबंधिता वर कारवाई करण्यात येईल. तसेच द्राक्ष खरेदी साठी बाहेरून आलेले व्यापारी यांची संपूर्ण माहिति ग्रामपंचायत कार्यलयात असणे आवश्यक आहे जेणे करून बऱ्याच वेळा पर राज्यातील व्यापारी स्थानिक पत्ता देतात व शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक करून रहिवासी ठिकाणावरून निघून जातात त्याकरता व्यापाऱ्यांचा मूळ पत्ता असणे आवश्यक आहे.व्यापाऱ्यांना घर अथवा खोल्या भाडे तत्वावर देतांना करार करून च घर अथवा खोल्या देण्यात याव्या.असे निफाड पोलिस निरीक्षक गणेश गुरव यांनी घर मालक यांची पोलिस ठाण्यात मिटिंग घेऊन आवाहन करण्यात आले.

## स्वराज्य पोलीस मित्र पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटना चोपडा कार्यकारणी ची बैठक उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**जळगाव प्रतिनिधी**
**समाधान पाटील**

स्वराज्य पोलिस मित्र पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दिपकजी कांबळे व संस्थापक तथा मुख्य महासचिव कमलेशजी शेवाळे देवा व महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्षा तथा विश्वस्त सौ धनश्रीताई उत्पात तसेच सर्व विश्वस्तांच्या मार्गदर्शनाखाली चोपडा येथील शासकीय विश्रामगृह येथे दिनांक.२६/०१/२०२५ रविवार रोजी ठीक ११ वाजता स्वराज्य पोलीस मित्र पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटनेच्या बैठकीला सुरुवात करण्यात आली सदर बैठकीचे प्रमुख पाहुणे म्हणून खानदेश प्रमुख राजेंद्र वानखेडे यांची उपस्थिती होती.त्यानंतर खानदेश प्रमुख राजेंद्र वानखेडे यांचा जळगाव जिल्हाध्यक्ष हेमकांत गायकवाड आणि जळगाव जिल्हा उपाध्यक्ष विजय सपकाळे यांच्या हस्ते शाल व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला भुसावळ तालुकाध्यक्ष मिलिंद सोनवणे यांचा सत्कार



तालुका सहसंघटक पवन कोळी यांनी केला तसेच भुसावळ तालुका संपर्कप्रमुख इमरान खान यांचा सत्कार प्रसिद्धी प्रमुख चंद्रकांत पाटील याच्या हस्ते करण्यात आला.चोपडा तालुका कार्याध्यक्ष मिलिंद वाणी यांचा सत्कार भुसावळ तालुकाध्यक्ष मिलिंद सोनवणे यांचा हस्ते करण्यात आला.सर्वप्रथम पदाधिकाऱ्यांना ओळखपत्र व नियुक्तीपत्र देण्यात आले आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या व संघटना बळकट वाढीसाठी प्रयत्न करण्याचे सांगितले सर्व पदाधिकाऱ्यांचा परिचय व बैठकीचे मुद्दे माहिती अधिकार कार्यकर्त्याचे काम काय असते व संघटना वाढीसाठी काय करावे माहिती अधिकार कायद्याचे महत्त्व तसेच माहिती अधिकार कार्यकर्ता म्हणून कशाप्रकारे काम करावे या विषयावर खानदेश प्रमुख राजेंद्र वानखेडे यांचे विशेष मार्गदर्शन केले. भुसावळ तालुकाध्यक्ष मिलिंद सोनवणे यांनी देखील थोडक्यात आपले मनोगत व्यक्त करून पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले व संघटनेचे ध्येय धोरण व संघटने बद्दल माहिती दिली.जळगाव जिल्हाध्यक्ष हेमकांत गायकवाड यांनी संघटनेमध्ये मागील दोन ते तीन वर्षापासून संघटने सोबत असून काम करत असताना आलेले अनुभव व संघटने प्रति एकनिष्ठ पणे केलेले काम व कार्य वरिष्ठांचे मार्गदर्शनामुळे मी आज न डगमगता काम करत आहे सामाजिक कार्य करत असताना शासकीय कार्यालयातील कारभार पारदर्शक व्यवहार टिकून राहावी किंवा भ्रष्टाचार मुक्त करण्याचा व भ्रष्टाचार उघड करण्यासाठी माहिती अधिकार कायद्याचा उपयोग कसा करावा व माहिती अधिकार कायदा कशा पद्धतीने वापर करावा याबद्दल मार्गदर्शक केले तसेच संघटना वाढीसाठी देखील आश्वासन दिले त्यानंतर जिल्हाउपाध्यक्ष विजय सपकाळे यांनी देखील आपला परिचय करतेवेळी मला देखील स्वराज्य पोलीस मित्र व पत्रकार संरक्षण संघटनेचे कामकाज आवडले व संघटनेमध्ये काम करण्यासाठी मला देखील आत्मविश्वास चांगल्या प्रकारे मिळेल व संघटनेत काम करताना मला पाठबळाची आवश्यकता होती ती आता मला संघटनेमुळेच त्यांनी संघटनेचे कामकाज ध्येय धोरण यानुसारच काम करण्याबाबत सांगितले व येणाऱ्या काळात आपण संघटनेचे काम फार मोठ्या प्रमाणात करू व संघटना बळकट करू असे आश्वासन बैठकीत दिले.बैठकीचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिल्हाध्यक्ष हेमकांत गायकवाड यांनी केले तसेच बैठकीचे नियोजन खानदेश प्रमुख राजेंद्र वानखेडे व जिल्हाध्यक्ष हेमकांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनातून करण्यात आले होते.बैठकी च्यावेळी खानदेश प्रमुख राजेंद्र वानखेडे,जळगाव जिल्हाध्यक्ष हेमकांत गायकवाड,जिल्हा उपाध्यक्ष विजय सपकाळे,जिल्हा संपर्कप्रमुख महेंद्र चौधरी,भुसावळ तालुकाध्यक्ष मिलिंद सोनवणे,तालुका संपर्कप्रमुख इम्रान खान,चोपडा तालुकाध्यक्ष सुनील पावरा,तालुका उपाध्यक्ष रवींद्र कोळी,तालुका कार्याध्यक्ष मिलिंद वाणी,तालुका सहसंघटक पवन कोळी,तालुका प्रसिद्धीप्रमुख चंद्रकांत पाटील,तालुका सचिव अविनाश बाविस्कर,तालुका संपर्कप्रमुख महेंद्र पाटील,तालुका संघटक खलील तडवी उस्थीत होते.सदर कार्यक्रमासाठी सहकार्य तालुका प्रसिद्धीप्रमुख चंद्रकांत पाटील आणि तालुका सहसंघटक पवन कोळी यांनी केले.बैठकीनंतर उपस्थिताचे आभार जिल्हा उपाध्यक्ष विजय सपकाळे व तालुका प्रसिद्धीप्रमुख चंद्रकांत पाटील यांनी मानले.

## आफ्रिकन महिलेच्या लघवी लीक त्रासातून अपोलोने केली मुक्तता

### ४० वर्षीय मोझाम्बिक महिलेवर लघवी असंयम आजारावर मिनीमली इन्वेसिव्ह प्रक्रिया करण्यात आली

**दैनिक युवक आधार -**
नवी मुंबई, २८ जानेवारी २०२५: अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये आग्नेय आफ्रिकेतील एक देश मोझाम्बिकहुन आलेल्या ४० वर्षे वयाच्या महिलेवर यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. श्रीमती ऍलिस यांना बऱ्याच वर्षांपासून मूत्र असंयमाचा त्रास (लघवी लीक) होता. या विकाराचा खूप मोठा परिणाम त्यांच्या दैनंदिन आयुष्यावर झाला होता, खोकणे किंवा शिंकणे यासारख्या सामान्य क्रिया देखील खूप आव्हानात्मक बनल्या होत्या. अपोलो हॉस्पिटल्समध्ये श्रीमती ऍलिस यांच्यावर मिनिमली इन्वेसिव्ह प्रक्रिया करण्यात आली, ज्यामुळे त्यांना लक्षणांपासून आराम मिळाला आणि त्यांना स्वतःचा आत्मविश्वास परत मिळवण्यात मदत मिळाली. या यशस्वी सर्जरीने त्यांना त्यांची जीवन गुणवत्ता परत मिळवून दिली, इतकेच नव्हे तर, स्वातंत्र्याची नवीन अनुभूती करून दिली, मूत्र असंयमची चिंता न करता जीवन जगण्याची सुविधा मिळवून दिली. मूत्र असंयम ही एक सर्रास आढळून येणारी समस्या आहे पण तरीही गैरसमजुती, सामाजिक कलंक आणि त्यावरील उपचारांविषयी जागरूकतेचा अभाव त्यामुळे बहुतांश वेळा ही समस्या दुर्लक्षिली जाते. अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने महिलांना आवाहन केले आहे की, असे त्रास होत असतील तर गप्प राहू नका, पुढे या, बोला आणि टीओटी सर्जरीसारख्या मिनिमली इन्व्हेसिव पर्यायांची माहिती करून घ्या. हे उपचार तुमच्या जीवनाची गुणवत्ता आणि तुमचा आत्मविश्वास परत मिळवून देऊ शकतात. श्रीमती ऍलिस यांच्यावर ट्रांस-ओबट्यूरेटर टेप (टीओटी) सर्जरी ही मिनिमली इन्व्हेसिव प्रक्रिया करण्यात आली. या प्रगत तंत्रामध्ये एक छोटी चीर दिली जाते आणि स्पायनल ऍनेस्थेशिया देऊन ही प्रक्रिया केली जाते. अति



जोखमीची स्थिती असलेल्या, श्रीमती ऍलिस यांच्यासारख्या रुग्णांसाठी ही प्रक्रिया जोखीम कमी करते. या प्रक्रियेनंतर त्यांची तब्येत पूर्णपणे बरी झाली आणि लघवी लीकच्या त्रासातून मुक्तता मिळाली. श्रीमती ऍलिस, मूत्र असंयमीत रुग्ण, मोझाम्बिक यांनी सांगितले,"गेली अनेक वर्षे मी भीती आणि अस्वस्थतेमध्ये काढली, लघवी लीक होईल या भीतीने मी अगदी साध्यासोप्या गोष्टी देखील करू शकत नव्हते. शारीरिक ताण तर होताच पण त्याहीपेक्षा मोठे मानसिक दडपण स्वतःसोबत घेऊन जगत होते. मला खूप ओशाळल्यासारखे व्हायचे, चारचौघांमध्ये जाणे मी टाळायचे आणि रोजची साधीसोपी कामे करताना देखील मला खूप त्रास व्हायचा. अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने माझ्या आयुष्यात नवे परिवर्तन घडवून आणले. डॉक्टरांनी माझ्यावर अतिशय सहाभूतिपूर्ण भावनेने उपचार केले, मला नीट समजून घेतले. आज मी आत्मविश्वासाने चालू शकते आणि भीती न बाळगता जगू शकते आहे." डॉ हिमानी शर्मा, सिनियर कन्सलटन्ट-ऑब्स्टट्रिक्स, गायनॅकॉलॉजी आणि रोबोटिक सर्जरी, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई यांनी उपचार करण्याचे महत्त्व समजावून सांगताना त्या म्हणाल्या,"मूत्र असंयम ही फक्त एक वैद्यकीय स्थिती नाही तर हे एक आव्हान आहे, महिलेच्या आयुष्यातील प्रत्येक पैलूवर याचा प्रभाव पडतो. महिलेचा आत्मविश्वास, तिची चारचौघांमध्ये मिसळण्याची क्षमता आणि तिचे इतरांसोबतचे संबंध या सर्वांवर त्याचा परिणाम होतो. अनेक महिला हा त्रास कोणालाच सांगत नाहीत किंवा त्यांना याबद्दल काहीच माहिती नसते, त्यामुळे त्या उपचार करून घेत नाहीत. अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईमध्ये आम्ही प्रगत उपचार पुरवू शकतो, हे उपचार सुरक्षित आणि प्रभावी असतात. उपचार यशस्वी झाल्यानंतर त्या महिलेच्या चेहऱ्यावरील हास्य पाहून आमची खात्री पटली की, आम्ही त्यांना त्यांचे आयुष्य परत मिळवून देण्यात मदत केली आहे आणि हेच आमच्या कामाचे सर्वात मोठे समाधान आहे." मूत्र असंयम हा त्रास अनेकांना असतो पण बऱ्याचदा त्याकडे दुर्लक्ष केले जाते. खासकरून मध्यमवयीन महिलांना हा त्रास सर्रास जाणवतो. श्रीमती ऍलिस यांचा मूत्र असंयमाचा त्रास गंभीर होताच शिवाय त्यांना इतरही अनेक त्रास होते, त्यामुळे पारंपरिक सर्जिकल पर्याय असुरक्षित ठरण्याची शक्यता होती. तरीही अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईतील अत्याधुनिक सुविधा आणि विशेषज्ञांच्या मेडिकल टीमने केलेल्या प्रयत्नांमुळे त्यांना असे सोल्युशन मिळाले ज्यामुळे त्यांचे जीवन पूर्णपणे बदलून गेले.



स्वामी विवेकानंद बहुउद्देशीय सेवाभावी शिक्षण संस्था, रामराई ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने भारतीय प्रजासत्ताक दिना निमित्त विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या मध्ये या शाळेचा विद्यार्थी शेख अरहान अजहर याने प्रथम क्रमांक पटकाविला. त्याला चषक, मेडल, प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी उपस्थित मान्यवर व पालक शेख अजहर पटेल व इतर

**(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)**

**जाहिरात**

**कै. तात्यासाहेब पाटील बहुउद्देशीय सेवाभावी संस्था सामाजिक कार्यात कार्यरत असलेल्या आमच्या संस्थेत समाजोपयोगी व्यसनमुक्ती प्रकल्पात नवी मुंबई परिसरात काम करण्याची संधी**
**खालील पदे भरणे आहे**
**Projects Director - 1**
**Projects Manager - 1**
**M&E Cum Accountant - 1**
**Counselor - 1**
**Out Reach Worker - 3**
**Peer Educators - 3**
**संपर्क**
**महेश सारणीकर**
9766366611





## NFIFWI, (LUC)विकास अधिकारी संघटनेच्या शिष्टमंडळाने खासदार रविंद्र चव्हाण यांची घेतली भेट

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड -:** नायगाव जनसंपर्क कार्यालय येथे विमा कायदा 1938 कलम 42 (2) मधील प्रस्तावित दुरुस्ती विधेयकास विरोध दर्शवण्यासंदर्भात नांदेड जिल्ह्याचे खासदार या नात्याने शिष्टमंडळाने रविंद्र वसंतराव चव्हाण साहेब यांना निवेदन दिले. निवेदनात वरिल कायद्यात बदल केल्यास ते बदल देशातील सार्वजनिक विमाक्षेत्रातील कंपनी LIC साठी हानिकारक आहेत,तसेच LIC चे 14 लाख विमाप्रतिनीधी आणि करोडो पॉलिसी धारक यांचे अर्थिक नुकसान होण्याची शक्यता आहे तसेच विमाक्षेत्रात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होण्यास अडथळा येईल अशी माहिती दिली. यावेळी शिष्टमंडळात NFIFWI नांदेड चे अध्यक्ष श्री सुधाकर अडकिणे,सचिव श्री गिरीश देशपांडे उपाध्यक्ष श्री सुरेश दुडले, निवासी सचिव श्री हंसराज पाटील,सहसचिव श्री नकुल शिरपुरकर आणि LIC नांदेड विभागातील जवळपास 60 विकास अधिकारी उपस्थित होते खासदार रविंद्र चव्हाण यांनी वरिल प्रश्न संसदेमध्ये व वित्तमंत्रालयात मांडण्यासंदर्भात शिष्टमंडळास आश्वासन दिले

# पुण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे हस्ते ध्वजारोहण

**दैनिक युवक आधार**
**पुणे विभागीय प्रतिनिधी**
**सुनील कलशेट्टी**

**पुणे** (दिनांक २७ जानेवारी २०२५)--भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्हा पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पुणे पोलीस कवायत मैदान शिवाजीनगर येथे त्यांनी राष्ट्रध्वज फडकावून राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. लोकांनी, लोकांसाठी चालवलेले, लोकांचे राज, हा विचार घेऊन देशाने गेल्या ७५ वर्षाची गौरवशाली वाटचाल केली. या ७५ वर्षांत देशासमोर अनेक संकटे आली, आव्हाने निर्माण झाली, परंतु देश कुणापुढे झुकला नाही, वाकला नाही, डगमगला नाही. भक्कम उभा राहिला, असे गौरव उद्गार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काढले. यावेळी आ. बापूसाहेब पठारे, विभागीय आयुक्त डॉ चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुड्डी, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार , पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ राजेंद्र भोसले, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह, पी एम आर डी चे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश म्हसे, स्वातंत्र्य सैनिक यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, विविध विभागाचे



वरिष्ठ अधिकारी- कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी आणि नागरिक उपस्थित होते. नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा देत उपमुख्यमंत्री श्री अजित पवार म्हणाले, शेकडो वर्षाच्या पारतंत्र्यानंतर १५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वतंत्र झाला. त्यावेळी आपल्या समोर अनेक संकटे, आव्हाने होती. त्या संकट व आव्हानांवर मात करण्याची दिशा २६ जानेवारी १९५० ला भारताला प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून स्वीकारून आपण निश्चित केली. तेव्हापासून ७५ वर्षा देशासमोरच्या प्रत्येक संकटाला, आव्हानाला, एकजुटीने, निर्धारण समोर जाण्याचं काम प्रत्येक देशवासियांनी केलं . देशाची एकता, अखंडता, सार्वभौमता, संविधान, देशातील लोकशाही, देशाच्या सीमा, सुरक्षित ठेवण्यासाठी अनेक सुपुत्र आणि प्राणांचं बलिदान दिलं. अनेक कुटुंबाने सर्वस्वाचा त्याग केला. त्या सर्वांच्या त्याग बलिदानापुढे नतमस्तक होण्याचा आजचा दिवस आहे. भारतीय प्रजासत्ताकाचा, भारतीय लोकशाहीचा, भारतीय स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करण्याचा दिवस आहे. देशांतर्गत कितीही मतभेद असले तरी, देशासमोरच्या बाह्य संकटासमोर संपूर्ण देश एक आहे. ही भावना गेल्या ७५ वर्षात अधिक मजबूत केली. ही भावना मजबूत होण्यामागे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाची ताकद आहे. देशान स्वीकारलेला सर्व धर्म समभावाच्या विचाराचं बळ आहे. गेल्या ७५ वर्षात जगातल्या इतर देशात लोकशाही व्यवस्थेला धक्के बसत असताना आपली लोकशाही सुरक्षित राहिली. याचं श्रेय, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या राज्यघटनेला, राजघटनेवरच्या लोकशाही वरच्या देशवासीयांच्या विश्वासाला आहे. देशानं गेल्या ७५ वर्षात, शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, सहकार, विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन, कला क्रीडा साहित्य, संस्कृती, सामाजिक सुधारणा अशा क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली. प्रगतीचे श्रेय ७५ वर्षाच्या काळात देशाच्या सर्वच क्षेत्रातल्या नेतृत्वानं जी मेहनत घेतली. कार्यकर्त्यांनी जी साथ दिली त्यांच्या त्या मेहनतीला आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारतर्फे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी (मरणोत्तर) पद्मभूषण, पद्मविभूषण, पद्मश्री पुरस्कार जाहीर झाले आहेत, हे पुरस्कार राज्याच्या राजकीय संस्कृती, कला समृद्धीचा गौरव आहे. अशा शब्दात श्री पवार यांनी पुरस्कारार्थीचे अभिनंदन केले. केंद्रीय गृह मंत्रालयाचे वतीने पोलीस अग्निशमनपदक तसेच सेवा पदक शौर्य पदक तसेच प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार व तसेच राज्य शैक्षणिक व प्रशिक्षण परिषदेच्यावतीने प्रदान करण्यात आलेल्या वीर गाथा राज्यस्तरीय पुरस्कार विजेत्याचेही अभिनंदन केले. यावेळी समाज कल्याण विभागाच्यावतीने पालकमंत्री श्री अजित पवार यांना भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची प्रत देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उल्लेखनीय सेवेबाबत अप्पर पोलीस महासंचालनालयाचे तुरुगांधिकारी तात्यासाहेब निंबाळकर एवढा मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक सुनील ढमाळ, तुरुगांधिकारी प्रकाश उकरंडे, सेवानिवृत्त सुभेदार आनंद हिरवे राष्ट्रपती सुधार सेवा पदक तसेच गुणवत्ता पूर्व सेवेबाबत अधीक्षक येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक अनिल खामकर, तुरुगांधिकारी तानाजी धोत्रे, सुभेदार प्रकाश सातपुते, कारागृह उपमहानिरीक्षक कार्यालयाचे तुरुगांधिकारी विजय कांबळे, राष्ट्रपती सुधार सेवा पदक प्राप्त झाले असून त्यांचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. . यावेळी झालेल्या शानदार संचालनाद्वारे राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली.. परेड संचलनात पुणे शहर, पुणे जिल्हा ग्रामीण, पिंपरी चिंचवड पोलीस दल, राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १ व २, पुणे लोहमार्ग, राज उत्पादन शुल्क, वाहतूक विभाग १०८ बालभारती, अग्निशामक दल तसेच विविध शाळांच्या पथकाने सहभाग घेतला. कार्यक्रमानंतर उपमुख्यमंत्री श्री अजित पवार यांनी उपस्थित स्वातंत्र्यसैनिक, माजी सैनिक, शालेय विद्यार्थी निमंत्रितांची भेट घेऊन प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

## जिल्हास्तरीय बालनाट्य स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धेच्या पारितोषिक वितरण संपन्न

**युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड शाळांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा व बाल नाट्य स्पर्धांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज असून या स्पर्धांमधून उदयाचे वक्ते व कलाकार तयार होण्यास निश्चितच मदत होईल असे प्रतिपादन खासदार भास्कर भगरे यांनी केले निफाड येथील न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ संचलित वैनतेय विद्यालयाच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त आणि न्या रानडे जयंती महोत्सवानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय बालनाट्य स्पर्धा आणि वक्तृत्व स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी न्या विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे विश्वस्त राजेंद्र राठी होते व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून खासदार भास्कर भगरे ,लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र डोखळे, जिल्हा शिक्षक नेते शिवाजी निरगुडे , अन्नामृत संस्थेचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर गोरक्षनाथ गंभीरे , न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे , संस्थेचे विश्वस्त रतन पाटील वडघुले , राजेंद्र राठी, दिलीप वाघवकर , प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत , विश्वास कराड ,नरेंद्र नांदे,वैनतेय विद्यालयाचे प्राचार्य बी.आर. सोनवणे, पर्यवेक्षक गुलाब टकले, पर्यवेक्षक बी. बी गुंजाळ आदी मान्यवर होते वैनतेय विद्यालयाच्या ज्ञानल कुंदे , संपदा शर्मा , श्रद्धा दौंडे ,शर्वरी कर्डीले या विद्यार्थिनींनी भरतनाट्यम सादर केले त्यानंतर जिल्हास्तरीय बालनाट्य स्पर्धेत प्रथम आलेल्या इगतपुरीच्या महात्मा गांधी हायस्कूलच्या बाल कलाकारांनी माझी रखुमाई या नाटिकेचे सादरीकरण केले यांप्रसंगी खासदार भास्कर भगरे यांचे भाषण झाले जिल्हा स्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे प्रायोजक विश्वास कराड ,नरेंद्र नांदे,आणि बालनाट्य




विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धा व बाल नाट्य स्पर्धांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज*

**- खासदार भास्कर भगरे**

स्पर्धेचे प्रायोजक राजेंद्र राठी, प्रभाकर कुयटे , मधुकर राऊत यांचा सत्कार करण्यात आला या प्रसंगी जिल्हास्तरीय बालनाट्य स्पर्धेत आणि वक्तृत्व स्पर्धेत यश मिळवलेल्या शाळांचा तसेच राज्यस्तरीय रस्सीखेच स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचा तसेच राज्यस्तरीय थ्रोबाल स्पर्धेत सुवर्ण पदक मिळविलेल्या मुलींचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रतन पाटील वडघुले यांनी तर सूत्रसंचालन रशीद पठाण यांनी केले

## भारतीय प्रजासत्ताक दिनी हितवर्धक संस्थेतर्फे दहावीच्या प्रश्नसंच-2025 चे प्रकाशन.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी रणिता ठाकूर**
**उरण रायगड**

हितवर्धक सामाजिक ग्रामीण संस्था दादर, ता- पेण, जि- रायगड या संस्थेतर्फे भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून, दिनांक 26 जानेवारी 2025 रोजी स्वर्गीय हिरू धर्मा ठाकूर इंग्लिश स्कूल व G.H.T. सायन्स अँड कॉमर्स कॉलेज दादर येथे इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना मार्च 2025 च्या परीक्षेसाठी प्रश्नसंच-2025 चे संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष व स्कूलचे संस्थापक श्री जी एच. ठाकूर - सर, सारडे विकास मंच चेअध्यक्ष श्री नागेंद्र म्हात्रे सर, श्री निवास गावंड सर, कोरियोग्राफर् मास्टर श्री सचिन पाटील सर, इ. दहावीचे विद्यार्थी आणि एच.डी.टी.इंग्लिश स्कूलचे विद्यार्थी, टीचर व इतर यांच्या उपस्थितीत प्रश्न संचाचे प्रकाशन संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अगोदर प्रास्ताविक मध्ये जी.एच. टी.सायन्स कॉलेज विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व इयत्ता अकरावी सायन्सला त्यांना व त्यांच्या पालकांना प्रवेश घेण्याचे आवाहन केले. यासाठी कॉलेजची वैशिष्ट्ये व इतर माहिती विद्यार्थ्यांना प्रास्ताविक मध्ये दिली आपले कॉलेज आपल्यासाठी आहे त्याला नावं लौकिकाला आणण्यासाठी आपणच सहकार्य केले पाहिजे असे त्यांना विशद केले व परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या, सारडे विकास मंच चे अध्यक्ष श्री नागेंद्र म्हात्रे सरांनी विद्यार्थ्यांना इयत्ता दहावीचे साठी खरतर परिश्रम करण्यासाठी प्रयत्न करावे व शुभेच्छा दिल्या त्याचप्रमाणे श्री निवास गावंड सर यांनी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी त्याचप्रमाणे श्री सचिन पाटील यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना परिस्थिती शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमात पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी एक देशभक्तीपर गीत डान्स करून सर्वांना मंत्र मुक्त केले कार्यक्रमाचे स्वागत , आभार आणि सूत्रसंचालन श्री ठाकूर जी. एच. यांनी केले






## लायन क्लब पनवेल झोनल एक कडून पटवर्धन रुग्णालयास 28 लाखांची मदत

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

२६ जानेवारी २०२५ रोजी लायन क्लब पनवेल झोनल १ कडून रा. स्व. संघ जनकल्याण समिती डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयास डायलेसिस विभागाच्या नूतनीकरणासाठी म्हणून अठ्ठावीस लाखाचा धनादेश देतेवेळी लायन क्लब पनवेलचे अध्यक्ष एस जी चव्हाण, जिल्हा गव्हर्नर, परमेश्वरन, लायन डॉ.संजय पोतदार यांनी रुग्णालयाच्या अध्यक्षा डॉ.किर्ती समुद्र , जनकल्याण समिती महाराष्ट्र प्रांत कोषाध्यक्ष प्रदिप पराडकर यांना सुपूर्त केला. या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व भारतमाता पुजनाने झाली. सर्व पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. लायन पनवेल झोन अध्यक्ष एस जी चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. जिल्हा गव्हर्नर परमेश्वरन, लायन डॉ. संजय पोतदार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. किर्ती समुद्र यांनी रुग्णालय देत असलेल्या सेवांची माहीती करुन दिली. रायगड जिल्ह्यातील नागरिकांना ५०० रुपये व अती गरीब रुग्णांना ३०० रुपयात डायलेसिस करणारे आपले एकमात्र रुग्णालय आहे हे आवर्जून सांगितले. जनकल्याण समिती प्रांत कोषाध्यक्ष प्रदिप पराडकर यांनी महाराष्ट्रात सुरु असलेल्या जनकल्याण समितीच्या ९ सेवा प्रकल्पांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.भक्ती सारंग यांनी केले. संस्थेच्या सहकार्यवाहीका अनुराधा ओगले यांनी सर्वांचे आभार मानले. शांती मंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली.

## राष्ट्रीय बंजारा विकास मिशन भारत संघटनेच्या

### राज्य मीडिया प्रमुखपदी अरूण राठोड यांची निवड.

..
**दैनिक युवक आधार**
**मंठा प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील तळणी येथील अरूण राठोड यांची राष्ट्रीय बंजारा विकास मिशन भारत संघटनेच्या राज्य मीडिया प्रमुखपदी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष देवराव राठोड यांनी निवड केली. आयोजित कार्यक्रमात नियुक्ती पत्र देऊन सन्मानित केले. यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष बळीराम राठोड, महाराष्ट्र प्रदेशध्यक्ष दतू जाधव, महिला प्रदेशाध्यक्ष सो. सविता चव्हाण,कार्यकारी अध्यक्ष अमोल चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष गुलबदास चव्हाण, मराठवाडा महासचिव वैजिनाथ जाधव यांचीही उपस्थिती होती. अरूण राठोड यांच्या निवडीमुळे बंजारा समाज देशात २६ उप नावाने विभागलेला असून देशात बजारा समाजाला अलग अलग नावाने अलग अलग कॅटेगरीत असल्याने बंजारा समाजाचा विकास झालेला नाही.म्हणून राष्ट्रीय बंजारा विकास मिशन २०१४ पासून श्री देवराव राठोड बंजारा यांचे नेतृत्वात भारत सरकारशी संघर्ष करीत आहेत. महाराष्ट्र राज्यात आदिवासी आरक्षण श्रेणीत समावेशासाठी महाराष्ट्र राज्यात संघटना मजबूत करण्यासाठी आपल्याला राज्य मिडीया प्रमुख या पदावर नियुक्त केले जात आहे. आपण आपल्याला जिल्ह्यात, राज्यात तांडा-तांड्यात संघटना मजबुत करावी, संघटनेने दिलेल्या जबाबदारीस आपण विश्वासास पात्र आहातच यात काही शंका नाही, आपणास दिलेल्या जबाबदारीस आपण खंबीर पणे लढा देऊन आपण समाजाला न्याय हक्का मोठा लढा द्यालच असेही नियुक्ती पत्रात नमूद केले आहे. या निवडीबद्दल पत्रकार अरूण राठोड यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# "झोपडपट्टी योजनेतील भ्रष्टाचाराविरोधात राजेंद्र पवारांचे आंदोलन"

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर**
**मुबंई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

जनकल्याण दहिसर एसआरए सह. गृह संस्था. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील भ्रष्टाचाराविरोधात दिनांक २७ जानेवारी २०२५ पासून ७ दिवसांचे लाक्षणिक उपोषण जनकल्याण दहिसर एसआरए सह. गृह संस्था. शांतीनगर एस. व्ही. रोड दहिसर पूर्व, मुंबई ४०००६८ येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत म्हाडा, एसआरए अधिकारी आणि विकासक हयांच्या संगनमताने कोट्यवधीचा भ्रष्टाचार झाला असल्याचे दिसून येत आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांना याबाबत वारंवार माहिती देऊनही अधिकारी वर्ग याकडे अर्थपूर्ण कानाडोळा करीत आहे. यामुळे शेकडो गोरगरीब जनतेला आपल्या हक्काच्या घरापासून बंचित रहावे लागत आहे. ही माहिती देण्याकरिता दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी पत्रकार परिषद घेण्यात आले. तसेच या विषयी तात्काळ चौकशी होऊन भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई न झाल्यास आझाद मैदान, मुंबई ४०००१ येथे दिनांक २७ जानेवारी २०२५ पासून ७ दिवसाचे लाक्षणिक




उपोषण करण्यात आले. गेल्या चार, पाच वर्षापासून एस. व्ही. रोड, शांतीनगर डोंगरी, दहिसर पूर्व, मुंबई-६८ येथील जनकल्याण (दहिसर) एसआरए सह. गृह संस्था हया नावाने सुरू असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झोपडी धारकांच्यावर अन्याय करून त्यांना बेघर केले जात आहे. परिशिष्ट-२ मधील अपात्र असलेल्या झोपडीधारका जवळ पुरावे असताना देखील पात्र केले जात नाही. याबाबत माहितीच्या अधिकारा अंतर्गत मिळालेल्या माहितीवरून हे निदर्शनास आले की, म्हाडा, एसआरए अधिकारी आणि विकासक हयांच्या संगणमताने जनकल्याण दहिसर एसआरए सह, गृह संस्थेच्या नावाने सुरू आसलेल्या पुनर्विकासात कोट्यवधी रूपयांचा भ्रष्टाचार केला जात आहे (केला आहे) हा भ्रष्टाचार उघडकीस आणण्यासाठी संबंधित परिसरात बॅनरद्वारे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी प्रयत्न करण्यात आला. मात्र याकडेही शासन प्रशासनाने जाणिवपूर्वक दुर्लक्ष केले १. एस.व्ही. रोड, शांतीनगर डोंगरी, दहिसर पुर्व, मुंबई-६८ जनकल्याण दहिसर, एसआरए सह. गृह संस्थेच्या नावाने सुरू असलेल्या झोपु योजनेत करण्यात आलेल्या भ्रष्टाचाराची शासनाने दखल घेऊन चौकशी करावी. २. ज्या झोपडीधारकांना अपात्र केलेले आहे त्यांना महाराष्ट्र शासन गृहविभाग, शासन निर्णय क्रमांक झोपुप्र-०८१०/प. क्र.९६/२०१८ झोपु-१, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक १६ मे २०१८ च्या आदेशाने पात्र करण्यात यावेत. ३. दिनांक १६ मे २०१८ चे परिपत्रक प्रमाणे फॉर्म-३ भरून देखील दखल न घेणाया अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. ४. विकासकाने मा. उपजिल्हाधिकारी झो. पु. यांना परिशिष्ट-२ मधील पात्र-अपात्र झोपडपट्टी धारकांच्या व्यतिरिक्त सादर केलेल्या ५५० ते ६०० बोगस करारनाम्याची चौकशी करावी.

५. जनकल्याण दहिसर, एसआरए सह. गृह संस्था पुनर्विकास योजनेत परिशिष्ट-२ हे वेगवेगळे असतानादेखील विकासकाने योजना वेगवेगळ्या न राबविता ती एकत्रित करून रबविण्याचा मनमानी कारभाराची चौकशी करण्यात यावी (प्रकल्प १ दिनांक १८/०७/२००६) रोजीचे परिशिष्ट-२ एकूण पात्र अपात्र ७९७, १२ हजार २५ स्के. मि. प्रकल्प-२ दिनांक ०७/१२/२००६ परिशिष्ट-२ एकूण पात्र-अपात्र १७०५, २६ हजार स्के.मि. ६. विकासकाने अपात्र झोपडपट्टी धारकांच्या सदनिका एकूण २९४ एस. आर. ए. प्राधिकरणास हस्तांतरीत केलेल्या नाहीत त्या तात्काळ एस. आर. ए. प्राधिकरणास हस्तांतरीत करण्यात याव्या, ७. विकासक झोपडीधारकांचे भाडे देखील वेळेवर देत नाही किंवा देतच नाही. तरीपण पार्ट-२ मधील इमारत क्र. ३ व ५च्या इमारतींना O.C. व C.C. दिली नसताना देखील लॉटरी पद्धतीने दिनांक २९/०८/२०२४ रोजी ९६४ घरांची सोडत काढण्यात आली. ह्याची सुद्धा चौकशी करावी. ८. विकासकाने रिहार्ब इमारतीत स्वतः साठी अधिक बांधलेल्या ३५० ते ४०० सदनिका ताब्यात घ्याव्यात ९. सी.सी.प्रमाणे सादर केलेल्या अपोर्ड प्लान न पाहता L.I.O. देणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करणे १०. म्हाडा, एसआरए अधिकारी आणि विकासक यांच्या संगणपताने करण्यात आलेल्या मनमानी पद्धतीच्या भ्रष्ट कारभाराची चौकशी होऊन संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी. यासाठी मी राजेंद्र आनंद पवार, आझाद मैदान, मुंबई-१ येथे सात दिवसांचे लाक्षणिक उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. सदर बाबतीत यंत्रणेने तातडीने कारवाई न केल्यास , उपोषण दरम्यान माझे काही बरेवाईट झाल्यास ह्याची जबाबदारी या सर्व संबंधित यंत्रणेवर राहील.असे राजेंद्र पवार यांनी ही माहिती दिली.

## कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी, बार्न्स कॉलेज पनवेलमध्ये क्रीडा महोत्सवाचा जल्लोष



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

पनवेलच्या कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमी बार्न्स कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स पनवेल येथे दिनांक 22 ते 27 जानेवारी 2025 या कालावधीत संपन्न झाला. या क्रीडा महोत्सवाने महाविद्यालयात नवीन ऊर्जा आणि प्रेरणा निर्माण केली. या महोत्सवाचे उद्घाटन डॉ. शिवदास कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. कल्पेश भोईर ,उपप्राचार्य प्रा. के. डी. शारा, कला विभाग प्रमुख प्रा. प्रशांत पाटील, आयटी विभाग प्रमुख प्रा. मयुरी वडके ,अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख प्रा.अंजु सोंखला आणि क्रीडा विभाग प्रमुख प्रा. मयुरेश जाधव, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनाच्या सोहळ्यात राहुल मुखर्जी यांनी क्रीडा शपथ घेतली. शपथविधीने सर्व सहभागी खेळाडूंमध्ये शिस्तबद्धता, खेळभावना आणि निष्ठा यांचे महत्व अधोरेखित केले. या महोत्सवात विद्यार्थ्यांसाठी रनिंग, बॅडमिंटन, स्विमिंग, व्हॉलीबॉल, डॉजबॉल, रस्सीखेच, कॅरम, चेस आणि क्रिकेट यांसारख्या खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या खेळांमधून विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांनी स्पर्धांमध्ये जिद्द, सहकार्य आणि आत्मविश्वासाने भाग घेतला. त्यांच्या सहभागामुळे महाविद्यालयाचा परिसर खेळाच्या जोशाने भारला गेला. या क्रीडा महोत्सवाने विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकता, संघभावना आणि आरोग्याविषयी जागरूकता निर्माण केली. शारीरिक व मानसिक विकासास चालना देणारा हा महोत्सव विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.